# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६१०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


परिपत्रक

क्रमांकः२/एनजीसी/वेतन/२०१८/१९२

दिनांक : 5 FEB 2018

विषय : राज्यातील विनाअनुदानित संस्थेमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेळेवर वेतन मिळत नसल्याबाबत प्राप्त होणा-या तक्रारींबाबत.

संदर्भ : संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/तक्रार/२०१५/११९७, दि.१.०९.२०१५

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शै. व. २०१८-१९ करीता प्रसिध्द केलेल्या ॲप्रुवल प्रोसेस हॅन्डबुक मधील प्रकरण ६ मधील परिशिष्ठ ६.४ मधील तरतुदी आणि महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, २०१६ मधील तरतुदींचे अवलोकन करून, महाराष्ट्र राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना सुचित करण्यात येते की, विनाअनुदानित संस्थेत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना त्यांचे वेतन व इतर अनुषंगिक देय भत्ते नियमीत वेळेवर अदा करण्यात यावेत. राज्यातील विनाअनुदानित संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेळेवर वेतन देण्याबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये यापूर्वीच निर्देश देण्यात आले आहेत.

उपरोक्तप्रमाणे विनाअनुदानित संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेतन व इतर देय भत्ते यांचे नियमीत प्रदान होत नसल्याची तक्रारी / निवेदने संचालनालयास प्राप्त झाल्यास, सदर निवेदनांमध्ये / तक्रारीमध्ये तथ्य आढळून आल्यास या बाबीची गंभीर दखल घेण्यात येईल. तसेच याबाबत संबंधित संस्थेबाबत शासनामार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / संबंधित शिखर संस्था आणि संलग्नीत विद्यापीठ यांचेकडे पुढील कारवाई करणेसाठी संचालनालयाकडुन शिफारस करण्यात येईल, व त्यामुळे होणा-या परिणामांस संस्था सर्वस्वी जबाबदार असेल, याची नोंद घ्यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सर्व विनाअनुदानित संस्थांच्या निंदर्शनास आणुन परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत निर्देशित करण्यात यावे.

२. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २अ, १०, १६ यांना माहितीकरीता.

3. कार्यासन क्र.३ यांना माहिती व संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.